**L. A. BILL No. VIII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२४ चा महा. ८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ याला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील, नोंद ९ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— २०२४ चा महा. ८.

| | |
|---|---|
| “१०. सुभद्राज नोवेल भोसले प्रायव्हेट (एसएनबीपी) विद्यापीठ, पुणे,<br>मुख्य कार्यालय—<br>गट क्रमांक ९०, ९४, ७२/१, रिव्हर रेसिडेन्सी जवळ, देहू आळंदी रोड चिखली, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र - ४११ ०६२.<br>मामुर्डी कॅम्पस—<br>साई नगर, पुणे-मुंबई एक्सप्रेस वे, महाराष्ट्र क्रिकेट संघटनाच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियम जवळ, संत तुकाराम नगर, मामुर्डी, देहू रोड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र - ४१२ १०१.<br>वाकड कॅम्पस—<br>जेक्यू २३ + पीडब्ल्यु एक्स, शंकर कलाट नगर, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र -४११ ०५७.<br>रहाटणी कॅम्पस—<br>सर्व्हे नंबर २९/२, रहाटणी-पिंपळे सौदागर रोड, आकाशगंगा सोसायटी जवळ, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र -४११ ०१७. | सुभद्राज एज्युकेशनल सोसायटी, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे ४११ ००६.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठाची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासनास, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे याबाबत खात्री पटली असेल तर, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे, अनुसूचीच्या भाग दोनमध्ये, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय यांचा समावेश करून, त्याद्वारे खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

३. उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, " सुभद्राज नोवेल भोसले प्रायव्हेट (एसएनबीपी) विद्यापीठ " या नावाने खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, सुभद्रा एज्युकेशनल सोसायटी, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, येरवडा, पुणे ४११ ००६ या प्रायोजक मंडळाने उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे.

४. म्हणून, सुभद्राज नोवेल भोसले प्रायव्हेट (एसएनबीपी) विद्यापीठ हे स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये योग्य त्या सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ४ मार्च, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८. ]**

**[ महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.